# रूंद सरी वरंबा पध्दतीने पेरणी **यशोगाथा**

# गोपालखेड , ता.जि. अकोला

अकोला क्लस्टर मध्ये एकुण २३ गावे असुन त्यापैकी गोपालखेड हे एक आहे. कृषीसमृध्दी प्रकल्पाअंतर्गत दिनांक      रोजी गोपालखेड येथे लाभार्थी शेतकऱ्याना रूंद सरी वरंबा पध्दतीने पेरणी बाबत माहिती व मार्गदर्शन संदर्भात श्री. दिलीप फुके पाटील यांनी माहिती व मार्गदर्शन केले.





प्रत्यक्षात शेतावर रूंद सरी वरंबा पध्दतीने पेरणी करण्याचे प्रात्याक्षिक दाखविण्यात आले. यामध्ये विशेषत: पेरणी करत असतांना पेरणी यंत्राचे जोडणी व सेटींग याबाबत श्री. दिलीप फुके पाटील यांनी मार्गदर्शन केले त्याचबरोबर हया पध्दतीने पेरणी केल्यास त्यापासुन होणारे फायदे व उत्पादनात होणारी वाढ याबाबत मार्गदर्शन केले रूद सरी मध्ये अतिरिक्त पावसाचे पाणी मुरते त्यामुळे ओलावा टिकुन राहतो. ज्यावेळेस पावसाचे गॅप पडतो अशावेळी सरीतील बोलावामुळे पिकाला पावसाच्या पाण्याचा ताण सहन करावा लागत नाही तसेच पाउस जास्त झाल्यास पासाचे अतिरिक्त पाणी सरीव्दारे वाहुन जाते आणि पिक चिभळत नाही, पिवळे पडत नाही त्यामुळे पिकाचे होणारे नुकसान टळते. हयाचबरोबर रूंद सरीमुळे पिकातील ईतर कामे उदा. फवारणी , पाणी देणे सोपे होते. या पध्दतीने पेरणी केल्यास एकरी ७ ते ८ किलो बियाण्याची बचत होउन खर्च कमी होते. पिकाला हवा व सुर्यप्रकाश भरपुर प्रमाणात मिळतो हया सर्व गोष्टीमुळे उत्पादनात एकरी २ ते ३ क्कीटल  वाढ होते व उत्पादन खर्चात कपात होते.

हया मार्गदर्शनामुळे गोपालखेड गावामध्ये सोयाबीन ची ४० एकर पेरणी रूंद सरी वरंबा पध्दतीने झाली आहे.

 